क्रमांक/साप्रवि/आस्था/का-४/कावि/5046/२०१८
कार्यालय जिल्हा परिषद,गोंदिया
**(सामान्य प्रशासन विभाग)**
दिनांक - 26/12/2018.

# - नोटीस -

सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक -अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ दिनांक २१ सप्टेंबर,२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचा-यांचे नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत जिल्हा परिषद गोंदियाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाची यादी सन २०१९ या वर्षात अंतरिम/तात्पुरती प्रतिक्षा यादी(प्रकरणाची **सदयस्थिती दिनांक ०१.०१.२०१९ प्रमाणे)** दिनांक 26/12/2018 रोजी जिल्हा परिषद,गोंदिया च्या www.zpgondia.gov.in या संकेतस्थळावर तथा जिल्हा परिषद,गोंदिया च्या नोटीस बोर्डावर प्रकाशित करण्यात येत आहे.

तरी सर्व अनुकंपा प्रतिक्षा सुचीतील उमेदवारांना कळविण्यात येते की अनुकंपा उमेदवाराची सदर प्रतिक्षा सूची यादी ही अनूकंपा रजिस्टर वरुन तयार करण्यात आली असुन **दिनांक १०.१२.२०१८ पर्यंत सामान्य प्रशासन विभागास प्राप्त प्रस्ताव अनुकंपा यादीमध्ये समावेश करण्यांत आले आहे.** यादीमधील वरील उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता वाढविण्यासाठी शैक्षणिक कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती व इतर माहिती बदल करण्याबाबत या कार्यालयास दिनांक 02/01/2019 पर्यंत लेखी विनंती अर्ज सादर करावे.

अनुकंपा नियुक्ती संबंधी शासनाच्या नियमाच्या अटी व शर्तीबाबत सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,गोंदिया येथे प्रत्यक्ष भेट देवुन नियमाची जाणीव उमेदवारांनी करुन घ्यावी. सदर यादी उमेदवाराच्या माहिती करिता प्रसिध्द करण्यांत येत आहे.

26/12/2018.
मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र.)
जिल्हा परिषद,गोंदिया

Scanned by CamScanner